# नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

मध्यवर्ती कार्यालये, तळमजला, पुणे ४११ ००१

दूरध्वनी क्र.०२०-२६१२२०७६/२६१२९४९४

फॅक्स क्र.०२०-२६१२७०४१ E-mail : ddtpurc_pune@rediffmail.com


---

जा.क्र.विनिनि/नासंघ/टिपीव्ही-७/ ४७८९ दि.२९/०८/२०१६

प्रति,
सहसंचालक, नगर रचना,
पुणे/ नागपूर/ कोकण/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती विभाग.

**विषय** :- विकास योजना/प्रादेशिक योजना
महाराष्ट्रातील मंजूर विकास योजना/प्रादेशिक योजनांकरीता मंजूर करण्यात आलेल्या प्रमाणित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम क्र.४४ व ४६ अन्वये दिलेल्या स्पष्टीकरणासंदर्भात शुध्दीपत्रक.

**संदर्भ** :- या कार्यालयातर्फे उपरोक्त विषयी दिलेले स्पष्टीकरण, पत्र क्र.७००, दि.७.४.२०१४.

शासनाने राज्यातील मंजूर विकास योजना/प्रादेशिक योजना क्षेत्रांसाठी प्रमाणित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली दि.२१.११.२०१३ रोजी अधिसूचना क्र.टिपीएस-१८१२/१५७/प्र.क्र.७१/१२/पुनर्बांधणी क्र.३४/१२/नवि-१३ अन्वये मंजूर केली असुन ती दि.२१.११.२०१३ पासून अंमलात आलेली आहे.सदर नियमावलीतील काही तरतूदी संदर्भात प्रादेशिक योजना क्षेत्राकरिता विनियम क्र.४४ व विकास योजना क्षेत्राकरीता विनियम क्र.४६ अन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदत्त असलेल्या अधिकारांन्वये संदर्भिय पत्रान्वये स्पष्टीकरण देण्यात आले आहे.सदर स्पष्टीकरणामध्ये विनियम क्र.२३.२.१ , तक्ता क्र.१३, अ.क्र.६ मध्ये "९ मी.रस्त्यांवर" असा उल्लेख आहे.वस्तुत: मूळ नियमावलीत " Road width up to 9 m." असे नमूद केलेले आहे. त्यामुळे त्याचा अन्वयार्थ लक्षात न घेता फक्त ९ मी. रुंदीचा रस्ता गृहित धरुन परवानगी दिली जात आहे, असे निदर्शनास आले आहे. अशा परिस्थितीत मूळ तरतूदीनुसार ९ मी. पर्यंत रुंदीचे रस्ते विचारात घेणे आवश्यक असल्यामुळे त्याची स्पष्टता रहावी या दृष्टीकोणातून विनियम क्र.२३.२.१ मधील अ.क.६ विषयी दिलेल्या स्पष्टीकरणाबाबत खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

| विनियम क्र. | दि.७/४/२०१४ रोजीचे स्पष्टीकरण | सुधारणा |
|---|---|---|
| २३.२.१ तक्ता क्र.१३, अ.क्र.६. | i) सदरहू टेबल क्र.१३ मधील अ.क्र.६ या ठिकाणी **९ मी. रस्त्यावर** तळ + २ मजल्याचे बांधकाम या टेबलमध्ये नमूद समास अंतरानुसार अनुज्ञेय होईल. | i) सदरहू टेबल क्र.१३ मधील अ.क्र. ६ या ठिकाणी **९ मी. पर्यंत रुंदीच्या रस्त्यावर** तळ + २ मजल्याचे बांधकाम या टेबलमध्ये नमूद समास अंतरानुसार अनुज्ञेय होईल. |

सदर बाब आपल्या विभागातील नगर रचना विभागाची सर्व कार्यालये तसेच सर्व नगरपरिषदा/ नगरपंचायती यांना आपले स्तरावरुन कळविण्यात यावी.

(मसुदा मा.संचालकांनी मान्य केला आहे.)

(सुनिल मरळे)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे करिता.

प्रत:
१.मा.प्रधान सचिव (नवि-1) नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई, यांना माहितीस्तव सादर.
२.सहसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई तथा संचालक नगर रचना.
३.मुख्य नियोजनकार, म.औ.वि.म.तथा संचालक नगर रचना.
४. कार्यासन क्र.१/२/३/४/५/६/७, मुख्य कार्यालय, पुणे.
५. स्पष्टीकरण पत्र संचिका (स्थायी आदेश संकलन) नासंघ.



D/Varun/Latter